# संपादकीय.....

## शांतता शिक्षण

उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकी करणाच्या विळख्यात मनुष्य मन: शांतीसाठी आसुसलेला आहे. दहशतवाद, भोगवाद, चंगळवाद आणि त्यापाठोपाठ दैववादाने संपूर्ण जगाला नव्हे संपूर्ण मानवजातीला असुरक्षिततेच्या विळख्यात कोंडले आहे. प्रत्येक जण मग तो जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात असो असुरक्षित आहे आणि त्यामुळेच तो स्वत:ची मन:शांती विसरला आहे. जागतिकीकरणामुळे सगळीकडे अस्वस्थता पसरली आहे. त्यामुळे प्रत्येकाला शांतता शिक्षणाची गरज आहे. शांतता शिक्षण म्हणजे काय? गौतम बुद्धांचे शांततेच्या संदर्भात खालील वक्तव्य बहुमोल असेआहे.

वरुन शांत असणारे वातावरण देखील आतून मोठा प्रलय धकधकणारे असू शकते म्हणून अंतर्गत शांतता फार महत्त्वाची ठरते. शांतता शिक्षणात भाषा ही अनमोल ठरते. तुमच्या प्रत्येक शब्दावरुन तुमचे वर्तन, तुमचे विचार दिशांकित होताना दिसतात. या शब्दांना तत्वज्ञानाचा, मानसशास्त्राचा आधार असतो . तुमच्या शब्दावरुन हा आधार लक्षता येतो. गौतम बुद्धांचा धम्म माणसांना माणसाशी माणसासारखे वागण्यासाठी समता, बंधुत्व, समान न्यायासोबत प्रज्ञा, करुणा हा मंत्र देतो. तसेच मनाच्या एकाग्रतेसाठी स्वयंप्रकाशीत व्हा जग दु:खाने भरलेले आहे. हे दु:ख निवारताही येते दु:ख निवारण्यासाठी अनेक मार्ग आहेत.. जन्म-मृत्यु चे चक्र आहे. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक यासारख्या अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी बुद्धाने अष्टांग मार्ग व पंचशील सांगितले आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला आहे. बाबासाहेब म्हणतात ज्यांनी बुद्धाच्या विचाराच्या दिशेने मार्गक्रमण केले ते देश अल्पावधितच विकास पावले आहेत.

डॉ. सुनिता मगरे
संपादक



Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013,ISSN : 2319-5525